e-ISSN 2278-5655
Impact factor 2.125

UGC Approved Online Journal (Sr.no 48178,48818)
AARHAT MULTIDISCIPLINARY INTERNATIONAL EDUCATION RESEARCH JOURNAL

# नंदुरबार शहरातील अध्यापक विद्यालय व महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचा संगणक वापराविषयी भितीचा अभ्यास

**डॉ. युवराज वसंत पाटील,**
**एन.टी. व्ही.एस. शिक्षणशास्त्र महाविद्यालय,**
**नंदुरबार, जि. धुळे.**

**सारांश**

***प्रस्तुत संशोधन पेपरात नंदुरबार शहरातील अध्यापक विद्यालय व महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचा संगणकविषयक भितीचा अभ्यास करण्यात आला आहे. संशोधनासाठी सर्वेक्षण पध्दतीचा अवलंब केला आहे. अध्यापक विद्यालय व महाविद्यालयातील प्रथम वर्षातील एकुण १२० विद्यार्थ्यांची न्यादर्श म्हणून निवड केली. माहितीचे संकलन करण्यासाठी डॉ. एस. राजशेखर व वैयापुरी यांच्या प्रमाणित संगणक वापराविषयी भिती या मापिकेचा अवलंब केला होता. संकलित माहितीचे विश्लेषण करण्यासाठी मध्यमान, प्रमाणविचलन व 't' मूल्य या संख्याशास्त्रिय परिमाणांचा उपयोग केला आहे. प्रस्तुत संशोधन कार्याचे निष्कर्ष, अध्यापक विद्यालय व महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना संगणक वापराविषयीची समान भिती दिसून येते.***

## प्रस्तावना

संगणक म्हणजे आजच्या प्रत्येक क्षेत्रातील महत्त्वपूर्ण विकासाचे आणि प्रगतीशील कामचे साधन आहे. संगणकामुळे आज जगाच्या पाठीवरील प्रत्येक कार्य सोप्या आणि सुलभ पद्धतीने होतांना दिसून येत आहे बँकिग क्षेत्रापासून तर संरक्षण क्षेत्रापर्यंत असो वा आता छोटे व मोठे उदयोग असो प्रत्येक व्यक्तीला संगणक हाताळण्याची गरज आहे. डिजीटल इंडिया याचा अर्थच असा आहे की, भारतातील प्रत्येकाने डिजीटल युगाशी संबंध जोडला पाहिजे. संजजज्‌ ज्ञान हे आजच्या शैक्षणिक पात्रतेमध्ये महत्त्वाची भूमिका बजावत आहे. त्यामुळे संगणक विश्वाशी नाते जोडले तरच यश आपल्या हाती आहे. हे प्रत्येक व्यक्तीने समजून घेतले पाहिजे. सर्वच गोष्टी आत ऑनलाईन होत आहेत. त्यामुळे प्रत्येक ठिकाणी आपल्याला संगणकाची गरज भासणार आणि केवळ संगणक असून चालत नाही तर संगणकाचे चांगले ज्ञान असणे महत्त्वाचे आहे. परंतु आजही भारतात आपण पाहत आहोत की, संगणकाला भिणारे आजही आहेत. म्हणून ते आपले कार्य आजही साध्या पद्धतीने करतात. परंतु आजच्या या उद्योन्मुख भारतात शिक्षण क्षेत्रात संगणकाची

भिती असणे चुकीचे ठरणार आहे. शिक्षण क्षेत्रात संगणक म्हणजे आत्मा होत चालला आहे. शैक्षकिण तंत्रविज्ञा-न ही -नवी-न शाजा-विषय बनला आहे. ज्ञानरचनावाद ही संकल्पनाच संगणकाशी संबंधीत आहे असे म्हणणे गैर ठरणार नाही.

अध्यापक विद्यालय आणि महाविद्यालयात अध्ययन करणारे विद्यार्थी शिक्षक पुढे वर्गात अध्यापनासाठी जातील तर त्या ठिकाणी पारंपारिक अध्यापन घेवून चालणार नाही, तर त्यासाठी त्यांना संगणकाचा वापर अध्यापनात करता येणे महत्त्वाचे आहे. म्हणूनच प्रस्तुत संशोधन शिक्षण क्षेत्रातील महत्त्वाचे, आणि भावी शिक्षकांचा संगणक वापराविषयी भितीचा अभ्यास केला आहे

**समस्या विधा**

नंदुरबार शहारतील अध्यापक विद्यालय व महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचा संगणक वापराविषयी भितीचा तुलनात्मक अभ्यास करणे.

**उद्घिष्टे**

१. अध्यापक विद्यालय व महाविद्यालयातील विद्यार्थी व विद्यार्थींनीचा संगणक वापराविषयी भितीचा तुलनात्मक अभ्यास करणे.

**परिज ल्पा**

१. अध्यापक विद्यालयाच्या विद्यार्थी व विद्यार्थीनीचा संगणक वापराविषयी भितीच्या मध्यमान गुणाकांत सार्थक फरक आढळून येत नाही.
२. अध्यापक महाविद्यालयाच्या विद्यार्थी व विद्यार्थीनीचा संगणक वापराविषयी भितीच्या मध्यमान गुणाकांत सार्थक फरक आढळून येत नाही.
३. अध्यापक विद्यालय व महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचा संगणक वापराविषयी भितीच्या मध्यमान गुणाकांत सार्थक फरक आढळून येत नाही.

**पध्दती :**

प्रस्तुत संशोधनात संशोधकास नंदुरबार शहरातील अध्यापक विद्यालय व महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचा संगणक वापराविषयीची भिती या विषयी सद्यस्थितीची माहिती जाणुन घ्यावयाची असल्याने वर्णनात्मक संशोधन पध्दतीतील सर्वेक्षण पध्दतीचा अवलंब केला आहे.

**जनसंख्या व न्यादर्श:**

प्रस्तुत संशोधनात नंदुरबार शहरतील अध्यापक विद्यालय व महाविद्यालयाला पवेशिक सर्व विद्यार्थी हे प्रस्तुत संशोधनाची जनसंख्या म्हणून निश्चित केले. प्रस्तुत संशोधनात अध्यापक विद्यालयातील ६० (मुले ३०+ मुली ३०) व अध्यापक महाविद्यालयातील ६० (मुले ३०+ मुली ३०) अशा एकुण १२० विद्यार्थ्यांची सहेतुक नमुना निवड पद्धतीने निवड केली आहे.

**संशोध साध:**

प्रस्तुत संशोधनात संशोधनाची माहिती संकलित करण्यासाठी डॉ. एस. राजशेखर व वैयापुरी यांच्या प्रमाणित संगणक भिती मापिकेचा अवलंब केला आहे. प्रस्तुत मापिकेत एकुण २९ विधाने दिली आहेत. यात पुर्णतः सहमत, सहमत, अनिश्चित, असहमत व पूर्णतः असहमत असे पर्याय दिले आहेत. सदर मापकिेची सप्रमाणता ०.८८ आणि विश्वसनियता ०.९४ निश्चित करण्यात आली आहे.

**संज्याशास्त्रीय परिमाजे:**

प्रस्तुत संशोधनात डॉ. एस. राजशेखर व वैयापुरी यांच्या प्रमाणित संगणक भिती मापिकेच्या साहाय्याने विद्यालयाच्या अध्यापक विद्यालय व महाविद्यालयातील विदयार्थ्याकडून संकलित केलेल्या माहितीचा अन्वयार्थ लावण्यासाठी मध्यमान, प्रमाणविचलन, 't' मूल्य या संख्याशास्त्रीय परिमाणाचा अवलंब केला आहे.

**माहिती विश्लेषण व अन्वयार्थ:**


ॉ. एस. राजशेखर व वैयापुरी यांच्या प्रमाणित संगणक भिती मापिकेच्या साहाय्याने द्यालयाच्या प्रथम व व्दितीय वर्षातील विदयार्थ्याकडून माहिती संकलित करून, विदयार्थ्यांनी नोंदवून दिलेला प्रतिसादाचे विश्लेषज ज रून संशोधन पेपरात मांडण्यात आलेल्या शुन्य परिकल्पनाचे परीक्षण करण्यात आले.

**परिज ल्प ०१:** अध्यापक विद्यालयाच्या विद्यार्थी व विद्यार्थीनीचा संगणक वापराविषयी भितीच्या मध्यमान गुणाकांत सार्थक फरक आढळून येत नाही.

| अध्यापक विद्यालय | N | M | SD | टेबल 't' मुल्य | 't' मूल्य (प्राप्त) | त्याग / स्वीज ार |
|---|---|---|---|---|---|---|
| विद्यार्थी | ३० | ७०.२० | १०.६७ | २.०० | १.९१ | स्वीज ार |
| विद्यार्थी-नी | ३० | ७५.२६ | ९.७६ | | | |

e-ISSN 2278-5655
Impact factor 2.125


UGC Approved Online Journal (Sr.no 48178,48818)
AARHAT MULTIDISCIPLINARY INTERNATIONAL EDUCATION RESEARCH JOURNAL




स्वाधिनता मात्रा (df) = ५८ साठी ०.०५ सार्थकता स्तरावर नमुना 't' मूल्य २.०० आहे व प्राप्त 't' मूल्य १.९१ असून ते नमुना 't' मूल्यापेक्षा कमी आहे. म्हणुन शुन्य परिकल्पनेचा स्वीकार करावा लाजेल. यावरून असे दिसून येते की, अध्यापक विद्यालयाच्या विद्यार्थी व विद्यार्थीनीचा संगणक वापराविषयी भितीच्या मध्यमान गुणाकांत सार्थक फरक आढळून येत नाही. यावरून असे म्हणता येईल की, अध्यापक विद्यालयाच्या विद्यार्थी व विद्यार्थीनीचा संगणक वापराविषयी भितीचे प्रमाण सारखेच दिसून येते.

**परिकल्पना ०२:** अध्यापक महाविद्यालयाच्या विद्यार्थी व विद्यार्थीनीचा संगणक वापराविषयी भितीच्या मध्यमान गुणाकांत सार्थक फरक आढळून येत नाही.

| अध्यापक महाविद्यालय | N | M | SD | टेबल 't' मुल्य | 't' मूल्य(प्राप्त) | त्याग / स्वीकार |
|---|---|---|---|---|---|---|
| विद्यार्थी | ३० | ७७.६६ | ९.३४ | २.०० | १.८३ | स्वीकार |
| विद्यार्थी-नी | ३० | ७३.३० | ९.०७ | | | |





स्वाधिनता मात्रा (df) = ५८ साठी ०.०५ सार्थकता स्तरावर नमुना 't' मूल्य २.०० आहे व प्राप्त 't' मूल्य १.८३ असून ते नमुना 't' मूल्यापेक्षा कमी आहे. म्हणुन शुन्य परिकल्पनेचा स्वीकार करावा लागेल. यावरून असे दिसून येते की, अध्यापक महाविद्यालयाच्या विद्यार्थी व विद्यार्थीनीचा संगणक वापराविषयी भितीच्या मध्यमान गुणाकांत सार्थक फरक आढळून येत नाही. यावरून असे म्हणता येईल की, अध्यापक महाविद्यालयाच्या विद्यार्थी व विद्यार्थीनीचा संगणक वापराविषयी भितीचे प्रमाण सारखेच दिसून येते.

e-ISSN 2278-5655
Impact factor 2.125

UGC Approved Online Journal (Sr.no 48178,48818)
AARHAT MULTIDISCIPLINARY INTERNATIONAL EDUCATION RESEARCH JOURNAL

**परिकल्पना ०३:** अध्यापक विद्यालय व महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचा संगणक वापराविषयी भितीच्या मध्यमान गुणाकांत सार्थक फरक आढळून येत नाही.

| अध्यापक | N | M | SD | टेबल 't' मुल्य | 't' मूल्य (प्राप्त) | त्याग / स्वीकार |
|---|---|---|---|---|---|---|
| विद्यालय | ६० | ७२.७३ | १०.२१ | १.९८ | १.५४ | स्वीकार |
| महाविद्यालय | ६० | ७५.४८ | ९.२० | | | |




स्वाधिनता मात्रा (df) = ११८ साठी ०.०५ सार्थकता स्तरावर नमुना 't' मूल्य १.९८आहे व प्राप्त 't' मूल्य १.५४ असून ते नमुना 't' मूल्यापेक्षा कमी आहे. म्हणुन शुन्य परिकल्पनेचा स्वीकार करावा लागेल. यावरून असे दिसून येते की, अध्यापक विद्यालय व महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचा संगणक वापराविषयी भितीच्या मध्यमान गुणाकांत सार्थक फरक आढळून येत नाही. यावरून असे म्हणता येईल की, अध्यापक विद्यालय व महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचा संगणक वापराविषयी भितीचे प्रमाण जवळपास सारखेच दिसून येते.

### निष्कर्ष

१. अध्यापक विद्यालयाच्या विद्यार्थी व विद्यार्थीनीचा संगणक वापराविषयी भितीच्या मध्यमान गुणाकांत सार्थक फरक आढळून येत नाही.

२. अध्यापक महाविद्यालयाच्या विद्यार्थी व विद्यार्थीनीचा संगणक वापराविषयी भितीच्या मध्यमान गुणाकांत सार्थक फरक आढळून येत नाही.

३. अध्यापक विद्यालय व महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचा संगणक वापराविषयी भितीच्या मध्यमान गुणाकांत सार्थक फरक आढळून येत नाही.

### शिफारशी

शिक्षणक्षेत्र म्हणजे विकासाचा राजमार्ग. सामाजिक व आर्थिक विकासासाठी शिक्षणाची कास धरणे माणसाला क्रमप्राप्त आहे. हे शिक्षणक्षेत्र अधिकधिक प्रभावी होवून समाजाला आणि राष्ट्राला प्रगतीच्या मार्गावर नेण्यासाठी सक्षम

ठरणे महत्त्वाचे आहे. म्हणूनच ज्यांनी 'अध्यापक' या व्यवसायाचा स्वीकार केला आहे त्यांना संगणकाचे ज्ञान असणे महत्त्वाचे आहे. तरी अध्यापक विद्यालय व महाविद्यालय या दोन्हीही अभ्यासक्रमांमध्ये संगणक विषय असला तरी तो केवळ सैध्दांतिक दृष्टया न शिकविता तो प्रात्यक्षिक कार्याने अधिकाअधिक शिकविला गेला पाहिजे. त्याचबरोबर सूज्म अध्यापन कौशल्यामध्ये संगणकासोबत अध्यापन असे एखादे कौशल्यांचा अंर्तभाव केला पाहिजे. त्याचबरोबर शाळेत ज्यावेळेस सराव पाठ घेतले जात असतात त्यावेळेस संगणकाव्दारे अध्यापनाचा सराव करणे महत्त्वाचे आहे हे या दोन्ही स्तरावंरील अध्यापकांनी ठरवून त्याचा उपयोजन केले पाहिजे.

**संदर्भसूची**

१. भिंताडे, वि. रा. (१९९९). *शैक्षणिक संशोधन पध्दती,* पुणे : नूतन प्रकाशन.

२. भोसले आणि डोणे. (२००९) *शिक्षणातील बदलते विचारप्रवाह.* प्रथमावृत्ती, कोल्हापूरः फडके प्रकाशन.

३. जगताप, ह. ना. (२००९). *प्रगत शैक्षणिक तंत्रविज्ञान आणि माहिती तंत्रविज्ञा[illegible],* पुणेः नित्यनूतन प्रज ाश-न.

४. मुळे आणि उमाठे (१९८७). *शैक्षणिक संशोधनाची मुलतत्वे,* नागपुरः महाराष्ट्र साहित्य निर्मीती मंडळ.

५. पंडीत, ब.बी. (२००५). *शिक्षणातील संशोधन*, पुणेः नित्य नुतन प्रकाशन.